# खरी मैत्रीण

नासिरा शर्मा
अनुवाद : रज़िया पटेल



₹ 14.00 ISBN 978-81-237-3214-5

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

*नवसाक्षर साहित्यमाला*

# खरी मैत्रीण

**नासिरा शर्मा**

अनुवाद

**रज़िया पटेल**

चित्रे

**श्रेयसी घोष**

NBT. INDIA

**नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया**

मूळ हिंदी पुस्तक प्रौढ शिक्षण संचालनालय, मध्य प्रदेश यांच्या सहकार्याने भोपाळमध्ये आयोजित केलेल्या कार्यशाळेत तयार केले गेले.

ISBN 978-81-237-3214-5

प्रथम प्रकाशन : 2000 (शके 1922)
पहिली आवृत्ती : 2004 (शके 1926)
दुसरी आवृत्ती : 2013 (शके 1934)

मूळ © नासिरा शर्मा, 1999
मराठी अनुवाद © नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, 2000

Sacchi Saheli *(Marathi)*

₹ 14.00

संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया
नेहरू भवन, 5 इन्स्टिट्यूशनल एरिया
वसंत कुंज, फेज-II, नवी दिल्ली-110 070 यांनी प्रकाशित केले.

रेशमा रडून रडून थकली होती. आज ती कॉलेजमधे देखील गेली नव्हती. आईने इतकी मनधरणी केली तरी तिने कालपासून घासही घेतला नव्हता. आई बिचारी संकटात सापडली होती. एकीकडे नवऱ्याचा राग तर दुसरीकडे मुलीचा हट्ट! कोणाची बाजू घ्यावी आणि कोणावर रागवावे?



कितीतरी वेळ ती चुपचाप बसून राहिली. अचानक तिला काहीतरी आठवले. ती उठली. चादरीने डोके झाकून घेतले. आणि ती घराबाहेर पडली. शेजारी मौलाना वहीद, यांच्या घरी ती गेली.

''या! कसे काय येणे केले?'' मौलाना साहेबांनी जपमाळ फिरवत विचारले.

''मुलीचं लग्न ठरतंय,'' रेशमाची आई हळूच म्हणाली.

''वा! वा! ही तर आनंदाची बातमी आहे... तारीख काढायची आहे का?'' मौलाना साहेबांचे डोळे चमकले.

''एवढं माझं नशीब कुठलं? मुलगी तयार नाही. तिच्या बाबांनी तर तिचं लग्न करायचंच, असं ठरवलं आहे...तुमची मदत मागायला आले आहे.'' रेशमाच्या आईचा गळा दाटून आला.

''झालंय तरी काय?'' हे विचारतांना मौलाना साहेबांचे डोळे बारीक झाले.

''त्या हमीद बटवेवाल्याने रेशमाला मागणी घातली आहे. पैसेवाला आहे. पहिली बायको मेली. आता दुसरं लग्न करायचं आहे. त्याला पाच मुलं आहेत. मोठी मुलगी रेशमापेक्षा पाच-सहा वर्षांनीच लहान आहे. मला हे लग्न थांबवायचं आहे,'' कापऱ्या आवाजात आई बोलली.

''असं आहे तर! खरंतर अशावेळी त्याने कुणा निराधार





विधवेशी लग्न करायला हवं. तिलाही आधार मिळेल आणि त्याच्या मुलांनाही बघणारे कोणी होईल,'' मौलाना म्हणाले.

''रेशमाच्या वडिलांचा धंदा अलीकडे नीट चालत नाही. त्या हमीदने मदतीची लालूच दाखवली आहे. त्यामुळे त्यांचा नाईलाज झाला आहे,'' रेशमाची आई म्हणाली.

''छी! छी सैतान शिरलाय का त्यांच्या मनात?''

''रेशमाचे अब्बा त्या हमीद बटवेवाल्याचा तिटकारा करू लागतील असा एखादा ताईत द्या,'' रेशमाची आई बोलली.

‘‘ठीक आहे, करतो काही तरी! शांत व्हा. मी सांगतो तसं करा. लग्नासाठी हो म्हणा. तारीख ठरवायला इथे यालच. तोवर मी यावाबत तोड काढतो. रेशमाला म्हणावं लग्नासाठी होकार दे, असे मी तिला सांगितले आहे. माझ्यावर भरवसा ठेवा.’’

रेशमाची आई आनंदाने घरी परतली. तिने मौलाना साहेबांचे सगळे बोलणे मुलीला सांगितले. रेशमाच्या मनात शंका आली. तिला आईचाही भरवसा वाटेना. दुसऱ्या दिवशी आईने तिला शपथ घेऊन सांगितले. तेव्हा कुठे रेशमाने वरवर होकार दिला.

ती राजी झाली हे कळताच रेशमाचे अब्बा-शकूर जूतेवाले यांना हायसे वाटले. ते लगेच मिठाई घेऊन मौलानांकडे गेले. मौलानांनी त्यांचा आनंदी चेहरा पाहिला आणि जोराने खाकरले.

‘‘जनाब मौलानासाहेब, मुलीसाठी मागणी आली आहे. चांगले खातेपिते घर आहे. एखादी चांगलीशी तारीख काढाल का?’’

‘‘हो! हो! का नाही? पण मला ‘अल्लाची मरजी’ बघितली पाहिजे.’’ असे बोलून मौलाना जपमाळ फिरवू लागले. जरावेळाने ते गंभीर झाले. शकूर जूतेवाल्यांनी घाबरून विचारले, ‘‘काय झाले?’’



‘‘अल्लाची मरजी नाही असे दिसते. हे मणी मोजा,’’ असे बोलून मौलानांनी जपमाळ पुढे केली.

‘‘पण का? मुलगा चांगला आहे, दुकान चांगलं चालतंय, पक्कं घर आहे, आणि...’’ शकूर जूतेवाले कासावीस झाले.

‘‘मुलीचा होकार आहे?’’

‘‘आधी नव्हता, आता आहे.’’

‘‘मग हेच कारण असेल... मुलीचा होकार नसेल तर लग्नाला धर्माची संमती नाही.’’

‘‘तुमचे बोलणे मला समजले नाही.’’

‘‘सायंकाळी या. मी काही पुस्तकांतील मजकूर वाचून दाखवीन. यासंबधी धर्माचा उपदेश कळेल,’’ एवढे बोलून मौलानांनी डोळे मिटले आणि जपमाळ फिरवायला सुरवात केली.

शकूर जूतेवाले बिचारे जड मनाने तेथून बाहेर पडले. दुकान नीट चालत नव्हते, घरातला खर्च भागत नव्हता, मुलीचे लग्न करायचे होते. हमीद वटवेवाला दुकान चांगले चालावे यासाठी मदत करायला तयार होता. पण आज तर सगळे मनोरथ धुळीला मिळाले होते. खुदाच्या मनात काय आहे कोण जाणे? दुकानात न जाता ते घरी परतले. बरे नाही असे सांगून पलंगावर पडले. त्यांनी डोळे मिटून घेतले. दोघी



मायलेकींना कळले की मौलानांनी आपले वचन पाळले आहे.

सायंकाळी तिघेही मौलानांकडे गेले. मौलानांनी रेशमाला विचारले,'' या लग्नासाठी तुझा होकार आहे का?'' मान खाली घालून तिने हळूच नाही म्हणून डोके हलवले. मग धाडस करून ती म्हणाली, ''मला पुढे शिकायचं आहे.''

मौलानांनी लाल पुठ्ठा असलेले एक पुस्तक काढले. आणि ते उघडून वाचू लागले: ''ऐका, इस्लाम धर्मानुसार



लग्नासाठी चार गोष्टी जरूर आहेत. एकतर...

''मुलीचा होकार, दुसरे...दोन पुरूष साक्षीदार हवेत. ते नसतील तर प्रत्येक पुरूषाऐवजी दोन महिला असाव्यात. तिसरे ... लग्न लोकांसमोर लागले पाहिजे. चौथी बाब स्त्रीधनाची... ते ठरवणे सर्वांत महत्वाचे आहे. लग्नानंतर बायकोची सगळी जबाबदारी घेण्याचे पती कबूल करतो, तेव्हा तो शकून म्हणून लग्नाच्या वेळेस पत्नीला स्त्रीधन देण्याचे वचन देतो.

''कुठलीही गोष्ट यातून सुटली तर तो विवाह कायदेशीर ठरत नाही. जर आपल्या ऐपतीपेक्षा जास्त स्त्रीधनाची रक्कम ठरवली आणि पती ती देऊ शकत नसेल तर ते लग्न बेकायदेशीर ठरते. कारण पती खोटे बोलला असा त्याचा अर्थ होतो. खोटे बोलून लग्न करणे बेकायदेशीर आहे. स्त्रीधनाची रक्कम ऐपतीनुसार ठरवावी आणि ती पत्नीला द्यावी. हे इस्लामनुसार बंधनकारक आहे.

''मुलीला हा अधिकार आहे की जर तिची मर्जी नसतांना तिचे लग्न होत असेल तर विवाहाच्या वेळी ती नकार देऊ शकते. त्यासाठीच तर लग्न सर्वासमोर लावण्यात येते.'' हे सगळे वाचून झाले. मग मौलानांनी पुस्तक मिटले.

''आता मी काय करू?'' शकूर जूतेवाले अगदी रडवेले झाले.

"मुलीला पुढे शिकू द्या. हमीदला नकार कळवा. परमेश्वरावर भरवसा ठेवा. त्याच्या दयेने दुकान परत चांगले चालेल!"

"ठीक आहे जनाब," शकूर जूतेवाले वाकून म्हणाले.

तिघेही घरी परत आले. शकूर जूतेवाले थकले होते. तिघेही जेवून लगेच अंथरुणावर पडले. जूतेवाल्यांच्या मनावरील ओझे हलके झाले होते. तर रेशमा खूपच आनंदी झाली होती. खुदाच्या मनात चांगलेच काहीतरी असेल, असा विचार करत ते झोपी गेले.

या घटनेनंतर काही महिने असेच गेले. रेशमाचा निकाल आला होता. ती बारावीत पास झाली होती. तिला शिक्षिका व्हायचे होते. त्यासाठी बी. एड्. करायचे होते. जूतेवाल्यांनी तिचे नाव कॉलेजात घातले. इकडे दुकानात मेहनतीने काम करायला सुरूवात केली. कामाचा फायदा थोडा दिसू लागला. आता शांत मनाने विचार करतांना त्यांना वाटू लागले, मी किती वेडेपणा करत होतो. एका म्हाताऱ्याशी आपल्या मुलीचे लग्न लावायला निघालो होतो.

दिवस हां-हां करता निघून गेले. रेशमा शिक्षिका झाली. ती एका शाळेत शिकवू लागली. घरात आनंद पसरला.

शकूर जूतेवाल्यांकडे रेशमासाठी पुन्हा लग्नाच्या मागण्या येऊ लागल्या. एका सायंकाळी त्यांनी मुलीला जवळ



बोलावले. ते म्हणाले," रेशमा कधी ना कधी मुलीला वडिलांच्या घरून जावेच लागते. हे बघ, या तीन मुलांचे फोटो आले आहेत. ते पाहून तुझी पसंती सांग."

वडिलांचे बोलणे ऐकून रेशमा लाजली. तिला मुलांचे ते फोटो बघायचे धाडस होईना. पण शेवटी लग्न म्हणजे जीवनातील महत्वाचा निर्णय. म्हणून, तिने त्या मुलांपैकी भोपाळच्या मुलाला पसंती दिली. मुलगा बी. ए. पास होता. सरकारी नोकरीत होता. दिसायला सज्जन वाटत होता. शकूरभाईंनी मुलाची सगळी माहिती काढली. मग लग्नाची तारीख ठरवली. रेशमा खूष होती. कारण ती आई-वडिलांजवळ आपल्याच शहरात राहणार होती.

घरात लग्नाची ढोलक-गीते सुरू झाली. नवरीच्या कपड्यांना जर टिकल्या लावायला सुरूवात झाली. मसाले, धान्य, दागिने, सुकामेवा यांची खरेदी सुरू झाली. या धामधुमीत रेशमा मधूनच उदास होत असे. आता हे घर सोडून आपण जाऊ, असे तिला वाटे.

लग्नानंतर सासरी निघतांना मौलाना वहीद यांनी तेच लाल पुस्तक रेशमाला दिले. आणि सांगितले,"हे पुस्तक वाचत जा, आणि इतरांनाही वाचून दाखव. प्रत्येक मुलीला आपल्यासाठी बनवलेले कायदे माहीत असले पाहिजेत. तरच ती आपली नीट काळजी घेऊ शकेल."



रेशमाने भरल्या डोळ्यांनी मौलानांकडे पाहिले. तिने पुस्तक छातीशी धरले. मनोमन ती म्हणाली, ''ही भेट माझी आयुष्यभराची साथीदार. माझी खरी मैत्रीण!''

Printed at Tarang Printers, F-40, Site 'C', Surajpur Industrial Area, Greater Noida (U.P.)